**एशिया इकॉनॉमिक डायलॉग 2025**

19 फेब्रुवारी 2025

‘एशिया इकॉनॉमिक डायलॉग (AED)’ हा भू-अर्थशास्त्रावरील परराष्ट्र मंत्रालयाचा महत्वाकांक्षी वार्षिक 'ट्रॅक 1.5 संवाद' आहे. पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या सहकार्याने संवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

2. संवादाच्या 9 व्या आवृत्तीचे आयोजन 20-22 फेब्रुवारी 2025 दरम्यान पुणे, महाराष्ट्र येथे करण्यात आले आहे. "विखंडनाच्या काळात आर्थिक लवचिकता आणि पुनरुत्थान", ही यंदाच्या आवृत्तीची संकल्पना आहे. भू-अर्थशास्त्र संबंधित समकालीन मुद्द्यांसोबत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलन, सायबर सुरक्षा, सायबर सुरक्षेचे आर्थिक पैलू, हिंद महासागर क्षेत्र आणि त्यापलीकडील नील अर्थव्यवस्थेचे पैलू , आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेसमोरची आव्हाने आणि शक्यता, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षमता विकास आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर हवामान बदलाचा प्रभाव या विषयांवरील चर्चासत्रे पार पडणार आहेत. आर्थिक विखंडनाच्या जटिलतेवर मार्ग काढताना लवचिकता आणि पुनरुत्थान साठी कृतीयोग्य दिशा निर्धारित करणे हे संवादाचे मुख्य उद्दिष्ट असणार आहे.

3. AED 2025 मध्ये भारतासोबतच अन्य देशांतील राजकीय नेते, वरिष्ठ सरकारी अधिकारी, धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योगतज्ज्ञ सहभागी होतील आणि विचारमंथनातून भविष्याच्या वाटचालीसाठी प्रारुप निश्चित करतील.

4. AED - 2025 विषयी अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या - https://aed.puneinternationalcentre.org

नवी दिल्ली

19 फेब्रुवारी 2025